**नियमित दिवाणी दावा क्र. ११/२०२३**
रामचंद्र सारंग वि. नरेश सारंग वगैरे

**निशाणी क्र. ३० वरील आदेश.**

प्रस्ततुचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी त्यास कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून त्याची कैफियत दाखल करुन घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीने अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, ते वयोवृध्द असून मुंबई येथे येवून जावून असतात. त्यांना कोर्ट कामाची पुरेशी माहिती नाही. त्यांना दाव्याच्या अनुषंगाने काही महत्वाचे कागदपत्रे वेळीच मिळाले नही त्यामुळे कैफियत तयार करणे शक्य झाले नाही. त्यांनी कैफियत दाखल करणेस मुद्दाम वेळ केलेला नाही. सदर प्रतिवादींची कैफियत रेकॉर्वर येणे न्यायपुर्ततेच्या दृष्टीने गरजेचे आहे. तसे न झाल्यास सदर प्रतिवादींचे न्यायहक्कास बाध येवून त्योच पैशाचे स्वरुपात कधीही भरुन न येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे. सबब, त्यांनी झालेला विलंब माफ होवून त्यांना कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेची विनंती त्यांनी केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जात विलंब माफीसाठी दिलेली कारणे खोटी व अविश्वासार्ह आहेत.

४. दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ हे आपल्या वकीलांमार्फत दाव्यात दि. ०५/०४/२०२३ रोजी हजर झाले. परंतु त्यांनी आपली कैफियत निर्धारित कालावधीमध्ये दाखल केली नाही. त्यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दि. ०६/०९/२०२३ रोजी दाखल केला आहे. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, कैफियत दाखल करण्यास प्रतिवादी क्र. १ यांना जवळजवळ दोन महिन्यापेक्षा जास्त काळ झालेला आहे. प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन व मनाईसाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी अर्जात कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाची नमूद केलेली कारणे स्वीकारार्ह नाहीत. परंतु, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून

प्रतिवादी क्र. १ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होवून प्रकरणांची संख्या वाढून गुंता निर्माण होणार नाही. तथापि, झालेल्या विलंबाबाबत प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ वर खर्च लादणे उचित दिसते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

– आदेश –

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ यांनी वादीस रक्कम रु. २००/– खर्चापोटी द्यावेत. प्रतिवादी क्र. १ ने खर्चाची रक्कम दिलेस प्रतिवादी क्र. १ ची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी.

३. प्रतिवादी क्र. १ ने आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश रद्दबातल समजणेत येईल.

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.

दिनांकः २०/०३/२०२४